**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१.**
दूरध्वनी :- २२६२०६०१, २२६२०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स :- २२६९२१०२
तार :- EDUTECH E-mail :- Desk14@dte.org.in Web :- http//www.dte.org.in

**तात्काळ**

क्रमांक :- १४/तंशिसं/अलेप/प्रलेआबैठक /२००९/ ५८
दिनांक :- 15

प्रति,
प्राचार्य ,
-----------------------,
-----------------------,

**विषय :- सन २००७ पर्यंत प्रलंबित असलेले लेखा आक्षेप, भांडार पडताळणी आक्षेप व संक्षिप्त देयके निकाली काढण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, राज्याचे मुख्य सचिवांनी विभागाच्या मूल्यमापनासाठी कार्यालयाशी संबंधीत असलेल्या कामकाजाबाबत पाच मुद्दे ठरवून दिलेले आहेत व त्यास अनुसरुन सचिव दरमहा आढावा बैठकांचे आयोजन करुन त्याव्दारे कामाचा आढावा घेत आहेत. **माहे मे, २००९ च्या पहिल्या आठवड्यात या मासिक सभेचे आयोजन केले** असून सदर बैठकीत मा. सचिव व्यक्तिशः संबंधित संस्थेच्या संस्थाप्रमुखाशी **प्रलंबित असलेले लेखा आक्षेप, भांडार पडताळणी लेखे व संक्षिप्त देयकांचा आढावा घेणार** असून **सदर बैठकीपूर्वी सन २००७ पर्यंत प्रलंबित असलेले लेखा आक्षेप, भांडार पडताळणी आक्षेप व प्रलंबित संक्षिप्त देयके कोणत्याही परिस्थितीत निकाली काढण्यात यावेत असे त्यांनी आदेश दिलेले आहेत.** तरी संस्थास्तरावर प्रलंबित असलेल्या लेखा व भांडार आक्षेपांबाबत तातडीने कार्यवाही करुन ते निकाली काढण्यात यावेत. तसेच संचालनालयस्तरावर व शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या लेखा व भांडार पडताळणी आक्षेपाबाबत व्यक्तिशः संपर्क साधून सदरचे लेखा आक्षेप निकाली निघण्यासाठी आवश्यक असणारे आदेश प्राप्त करुन घ्यावेत व याबाबतचा **अहवाल दि.२४ एप्रिल, २००९ पर्यंत या संचालनालयास सादर करावा.**

जे संस्थाप्रमुख सदर कालावधीत **सन २००७ पर्यंतचे प्रलंबित लेखा आक्षेप, प्रलंबित भांडार आक्षेप व संक्षिप्त देयके निकाली काढू शकणार नाहीत.** त्यांना सचिवांच्या बैठकीत याबाबत व्यक्तिशः हजर राहून खुलासा करावा लागणार आहे. तरी सदर प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेऊन प्राथम्य क्रमाने कारवाई करावी.

( डॉ. सु. का. महाजन )
प्र. संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

--------------------x----------------x--------------------

जा.क्र. विकापु/लेखा-१/प्र.ले.आ. बैठक/२००९-१०/४५५८
अति तात्काळ

तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
पुणे ४११ ०१६
दिनाक : 20 APR 2009

प्रत प्राचार्य, सर्व शासकीय संस्था, यांना माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी. त्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची प्रलंबित लेख आक्षेप, भांडारपडताळणी, व संक्षिप्त देयकाबाबतची माहिती मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना विहीत कालावधीमध्ये अवगत करण्यात यावी.

सहासंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे.